महाराष्ट्र पोलीस

**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- १७/१२/२०१८

## मुंबई आग्रा महामार्गावर ट्रक चालकांना मारहाण करून जबरीने लुटमार करणारे सराईत गुन्हेगार जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

---

दिनांक १४/१२/२०१८ रोजी सायंकाळचे सुमारास उत्तरप्रदेशातील **कंटेनर चालक नामे इमरान सत्तार शेख** हा मुंबई आग्रा महामार्गावर **तळेगाव, ता.इगतपुरी** शिवारात कंटनेर रोडचे बाजुस लावुन काच पुसत असतांना एका काळे रंगाचे पल्सर दुचाकीवर आलेले **अज्ञात ०३ इसमांनी** त्यास चाकुने पाठीवर, डोळयाचे वरती तसेच पोटावर वार करून दुखापत करून रोख २५ हजार रूपये, लायसन्स व कंटेनरची चावी जबरीने चोरून नेले बाबत **इगतपुरी पोलीस ठाणेस I गुन्हा रजि.नं. १२४/२०१८** भादंवि कलम ३९४,३२३,५०४ प्रमाणे **दि.१५/१२/२०१८ रोजी गुन्हा** दाखल करण्यात आला होता.

सदर घटनेबाबत **मा.पोलीस अधीक्षक श्री.संजय दराडे साो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. नीलोत्पल सो** यांनी तात्काळ दखल घेवुन गुन्हा उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी स्थागुशाचे पथकास घटनास्थळी तात्काळ पाचारण करून सदर गुन्हयातील कंटनेर चालकाकडे घडले प्रकाराबाबत सविस्तर माहिती घेतली. त्यानुसार सदर गुन्हयाचे कार्यप्रणालीवरून गुन्हा करणारे गुन्हेगार हे नजीकचे परिसरातीलच असल्याचा तर्क लावुन स्थागुशाचे पथकाने समांतर तपास सुरू केला. दरम्यान स्थागुशाचे पथक मुंबई आग्रा महामार्गावर इगतपुरी परिसरात तपास करीत असतांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी **सराईत गुन्हेगार नामे १) सतिष बाळु दोंदे,** वय २१, रा. तळेगाव, ता.इगतपुरी यास तळेगाव परिसरातुन ताब्यात घेतले. त्यास विश्वासात घेवुन कसोशिने चौकशी केली असता त्याने त्याचा साथीदार **नामे २) दिपक सखाराम जाधव,** वय २१, रा. तळेगाव, ता.इगतपुरी, ह.मु. दांड उमरावण, ता.शहापुर, जि.ठाणे याचेसह गेल्या तीन दिवसांपुर्वी मुंबई आग्रा महामार्गावर एका कंटेनर चालकास चाकुने मारून दुखापत करून रोख रूपये,कंटेनरची चावी व लायसन्स **जबरीने चोरून नेल्याची कबुली दिली आहे.** यातील आरोपी दिपक जाधव यास स्थागुशाचे पथकाने शहापुर तालुक्यातील लतीफवाडी शिवारातुन ताब्यात घेतले आहे. ताब्यात घेतलेले आरोपीतांचे कब्जातुन रोख २१०० रूपये, तसेच विविध ट्रक चालकांचे लायसन्स हस्तगत करण्यात आले आहे.

वरील आरोपी नामे सतिष दोंदे व दिपक जाधव हे दोघेही सराईत गुन्हेगार असुन त्यांचेविरूध्द यापुर्वी **कसारा पोलीस ठाणेस जबरी लुटमार व रेल्वे इगतपुरी पोलीस ठाणेस दरोडा** यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहे. वरील गुन्हयाचे समांतर तपासात सदर आरोपीतांकडुन महामार्गावरील लुटमारीचे अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, पोउनि स्वप्निल नाईक, सपोउनि नवनाथ गुरूळे, पोहवा शिवाजी जुंदरे, बंडु ठाकरे, पोकॉ संदिप हांडगे, सचिन पिंगळ यांचे पथकाने सदर गुन्हयातील आरोपीतांना ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे.